कार्यालयशिक्षण विभाग(प्राथ.)प.स.भातकुलीपरीसर,जिल्हापरिषद,अमरावती
Emai ID – eozpamravati@gmail.com Office Phone No.- 0721-2970206

जा.क्र. /जिपअ/शिक्षण/आस्था/डी-२/5945/२०२४ दिनांक :-23/ ०७/२०२४

# प्रेस नोट

**विषय :- पेसा क्षेत्रातील रिक्त पदे कंत्राटी करारतत्वावर शैक्षणीक सेवेसाठी पेसा क्षेत्रात काम करण्यास ईच्छुक सेवानिवृत्त शिक्षकांनी आवेदनपत्र सादर करण्याबाबत**

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र. ४१४/टिएनटि-१ दि. १५/०७/२०२४ सुचनेनुसार पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत. **स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळातील व खाजगी शिक्षण संस्थाच्या अनुदानित शाळांतील** सेवानिवृत्त शिक्षकांमधुन कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद अमरावती येथील पेसा क्षेत्रातील शिक्षकीय रिक्त पदे मानधनावर भरण्यात येत असुन त्यासाठी पेसा क्षेत्रात काम करण्यास ईच्छुक सेवा निवृत्त शिक्षकांनी खालील अटीशर्तीच्या अनुषंगाने आवेदनपत्र सादर करावे.

**पेसा क्षेत्रा करीता कंत्राटी सेवानिवृत्त शिक्षक पद नियुक्तीसाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती लागु आहेतः-**

१. अर्जदार व्यक्ती ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवा निवृत्त शिक्षक असणे अनिवार्य आहे
२. सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील
३. सदर नियुक्ती ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची आहे
४. मानधन रु. २००००/- (अक्षरी वीस हजार रुपये) प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभाव्यतिरीक्त)
५. नियुक्तीधारकास शिक्षणाधिकारी (प्राथ.) याच्याशी करारनामा स्वाक्षरीस करणे आवश्यक राहील
६. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहित काम सचोटीने व कर्तव्यपारायनतेने करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील
७. नियुक्तीधारकास शासनाने विहित केलेल्या अटी, शर्ती व जिल्हा परिषदेने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे तसेच करार पध्दतीने नियुक्ती झाल्याने नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे बंधपत्र/ हमीपत्र प्रत्यक्ष नियुक्तीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य आहे.
८. शाळा मधील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे अत्यावश्यक पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल
९. सेवा निवृत्त शिक्षक हे वैद्यकीय दृष्ट्या सेवा क्ररण्यास सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१०. ज्या शिक्षकांनी सेवाकालावधीत शिक्षा झाली असेल त्यांनी अर्ज करु नये.
११. अर्ज सादर करणा-या सेवानिवृत्त शिक्षकांनी संबंधित गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालयात आवक जावक शाखेत लेखी अर्ज दिनांक २६ /०७/२०२४ रोजी पर्यत कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करावेत तदनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही
१२. जिल्हा परिषद, अमरावती येथे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत
१३. कोणतेही कारण न देता अर्ज नाकारण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

१४. नियुक्ती कालावधीत शासन नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. गैरवर्तन, कामात हयगय, हलगर्जीपणा, निष्क्रियता आढळुन आल्यास तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१५. सदर नियुक्ती हि पेसा क्षेत्रा करीता असल्याने फ़क्त पेसा क्षेत्रात काम करण्यास ईच्छुक उमेदवांराचे अर्ज स्विकारण्यात येतील.

१६. वरीलप्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच किंवा करारनाम्यातील मुदत यापैकी जी बाब आधी होईल त्या कालावधी पर्यंत राहील.

ईच्छुक उमेदवारांनी पंचायत समिती स्तरावर अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना-अ, अटी व शर्ती ईत्यादी बाबी जिल्हा परिषद अमरावतीच्या www.zpamravati.gov.in या साईटवर पाहण्यास उपलब्ध आहेत.

Sangita

(संजीता मोहपात्रा,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

Scanned with OKEN Scanner